महाराष्ट्र शासन
सत्यमेव जयते

# सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.
Email :-roamravati@dtemaharashtra.gov.in Web :- www.jdroamt.org
Phone :- 0721- 257 3027, 2572577 Fax :- 0721- 257 7913

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

परिपत्रक

जा.क्रमांक.:- विकाअ/शिक्षण/२०२६/ 2292
दिनांक :- 25/08/2026

**प्रति,**

**प्राचार्य,**
**सर्व तांत्रिक व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या संस्था**
**अमरावती विभाग, अमरावती**

विषयः- : **तंत्रशिक्षण विभागांतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांच्या संस्था स्तरावरील व फेऱ्यांनंतर रिक्त राहिलेल्या जागांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सर्व संबंधित संस्था, विद्यार्थी व पालकांसाठी सूचना**

संदर्भः-१.मा.आयुक्त, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांची सूचना क्र.तशि प्र १२२६/प्र.क्र७/प्रवेश प्रक्रिया/२०२६/२०६१, दिनांक-२१/०८/२०२६
२. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.२/एनजीसी/प्रवेश प्रक्रिया सूचना/२०२६/७०२, दिनांक- २५/०८/२०२६

उपरोक्त संदर्भांकित विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, या तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या सर्व तांत्रिक पदवी व पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमांच्या संस्थामध्ये संस्था स्तरावरिल व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत, राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष, मुंबई यांनी संस्था, विद्यार्थी व पालकांसाठी संदर्भीय परिपत्रकानुसार सूचना जाहिर केलेल्या आहेत. सोबत प्रत जोडण्यात येत आहे.

त्यास अनुसरुन सर्व तांत्रिक व्यावसायिक पदवी व पदव्युत्तर अभ्यासक्रमांच्या संस्थांना, विद्यार्थ्यांना व पालकांना कळविण्यात येते की, संस्था स्तरावरिल व केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेनंतर रिक्त राहिलेल्या जागांच्या प्रवेश प्रक्रियेमध्ये पारदर्शकता, गुणवत्ता व नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी राज्य सामाईक प्रवेश परिक्षा कक्ष,मुंबई यांनी जाहिर केलेल्या सूचनांचे पालन करण्यात यावे.

सहपत्र- वरिलप्रमाणे

सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय
अमरावती

प्रत:- प्रोग्रामर, तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळावर टाकण्याकरिता

1030

महाराष्ट्र शासन
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई
८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०००01.
दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org

**क्र. तशि प्र १२२६/प्र क्र ७/प्रवेश प्रक्रिया/२०२६/२०६१** **दिनांक २१/०८/२०२६**

# *जाहीर सूचना*

**तंत्रशिक्षण विभागाअंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमांच्या संस्थास्तरावरील व CAP फेऱ्यांनंतर रिक्त राहिलेल्या जागांच्या प्रवेश प्रक्रियेबाबत सर्व संबंधित संस्था, विद्यार्थी व पालकांसाठी सूचना**

- महाविद्यालयांनी माहिती पुस्तिकेतील नियम १३ (Rule 13) नुसारच संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया राबवणे बंधनकारक आहे.
- संस्थास्तरावरील प्रवेश प्रक्रिया सर्व CAP फेऱ्या पूर्ण झाल्यानंतरच आणि अर्जदारांच्या 'Inter-Se-Merit'नुसार करण्यात यावी.
- महाविद्यालयांनी संस्थास्तरावरील प्रवेशाचे नियम, प्रक्रिया व माहिती पुस्तिका (Prospectus) आपल्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे अनिवार्य आहे.
- इच्छुक उमेदवार संबंधित महाविद्यालयात थेट अर्ज करू शकतात. तसेच, थेट अर्ज करणे शक्य नसल्यास उमेदवार आपल्या CAP पोर्टल लॉगिनद्वारे संस्थास्तरावरील 'Option Form' भरू शकतात.
- संस्थास्तरावरील प्रवेशासाठी प्राप्त अर्ज तसेच CET कक्षाकडून उपलब्ध करून देण्यात आलेली विद्यार्थ्यांची यादी विचारात घेऊन महाविद्यालयाने अधिकृत गुणवत्ता यादी (Merit List) तयार करून ती नोटीस बोर्डावर व अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करणे अनिवार्य आहे.
- विद्यार्थ्यांचा संस्थास्तरावरील प्रवेश निश्चित झाल्यानंतर महाविद्यालयाने त्याची नोंद CAP पोर्टलवर तात्काळ करणे बंधनकारक आहे.
- CAP फेऱ्या पूर्ण होण्यापूर्वी कोणत्याही एजंट, मध्यस्थ किंवा जागा मिळवून देण्याचा दावा करणाऱ्या व्यक्तींच्या आमिषाला विद्यार्थी व पालकांनी बळी पडू नये.
- सोशल मीडिया लिंक, एजंट किंवा खाजगी समुपदेशकांमार्फत प्रसारित होणाऱ्या खोट्या व दिशाभूल करणाऱ्या माहितीपासून सावध राहावे.
- कोणत्याही अफवा किंवा अनधिकृत माहितीवर विश्वास ठेवू नये. प्रवेश प्रक्रियेबाबतची माहिती फक्त CET कक्षाच्या अथवा संबंधित संस्थेच्या अधिकृत संकेतस्थळावरूनच तपासावी.

प्रवेश प्रक्रियेतील पारदर्शकता, गुणवत्ता व नियमांचे पालन सुनिश्चित करण्यासाठी सर्व संबंधित संस्था, विद्यार्थी व पालकांनी वरील सूचनांचे पालन करावे.

सही/-
(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
आयुक्त
महाराष्ट्र राज्य सामाईक प्रवेश परीक्षा
(सीईटी) कक्ष, मुंबई